MHND240003752021

**म.कौ.हि.का.क्रं ०५/२०२१**
**अर्चना शहापुरे व इतर वि. हरीदास शहापुरे व ईतर**

**निशाणी ०८ वरील आदेश**

**दिनांक २४/०३/२०२२**

**१.** अर्जदाराने अंतरिम पोटगीसाठी प्रस्तुतचा अर्ज कौटुबिक हिंसाचारापासुन महीलाचे सरंक्षण कायदा २००५ अन्वये दाखल केला आहे.

**२.** अर्जदाराचे असे कथन आहे की, अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदार क्र. १ यांच्या कायदेशिर विवाहाची पत्नी आहे. अर्जदार क्र. १ चा विवाह गैरअर्जदार क्र. १ सोबत सुमारे १७ वर्षापुर्वी संपन्न झाला. अर्जदार क्र. २ व ३ हे अर्जदार क्र. १ पासुन झालेले व गैरअर्जदार क्र. १ याचे अपत्य आहेत. अर्जदार क्र.२ व ३ चे वय आज रोजी १२ व १५ वर्ष आहे. लग्नानंतर अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदार क्र. १ यांच्या नांदवयास गेली व त्यानंतर गैरअर्जदार क्र. १ यांनी १५ वर्ष चांगले नांदवले तसेच त्यानंतर विना कारण तु मला पसंद नाहीस मला दुसरे लग्न करायचे आहे असे म्हणुन त्रास देवु लागले तसेच शारीरीक व मानसिक छळ करुन हिंसाचार केला. गैरअर्जदार क्र. २ ते ११ हे गैरअर्जदार क्र. १ चे नातेवाईक आहेत. अर्जदार क्र. १ तसेच अर्जदार क्र. २ व ३ यांना २०२० च्या दिपावलीला गैरअर्जदार क्र.०१ यांनी घराबाहेर हाकलुन दिले .अर्जदाराच्या वडीलांनी खर्च करुन हुंडा एक लाख रुपये व पाच ग्राम सोन्याची आंगठी देवुन दोनअंग आहेर तसेच संसार उपयोगी भांडी कुंडी कपडा – लता देवुन लग्न केले.

अर्जदाराचे गैरअर्जदाराशी आजही नाते संबंध कायम आहेत. अर्जदाराकडे उत्पनाचे किंवा उदरनिर्वाहाचे कोणत्याही प्रकारचे साधन नाही. अर्जदाराची स्व:ताची उपजिवीका भागवण्यासाठी असमर्थ आहे. अर्जदार क्र २ व ३ यांच्या शिक्षणाचा खर्च वाढला आहे. गैरअर्जदार क्र. १ यांच्यावर कोणतीही जबाबदारी नाही त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ यांनी पोटगी अर्जदार क्र. १ ते ३ यांना प्रत्येकी ५०००/. देण्याचे आदेशित करावे यासाठी प्रस्तुतचा अर्ज निशाणी क्र. ०८ खाली दाखल केला आहे. गैरअर्जदार क्र. १ ते ११ यांना नोटीसची बजावणी झाली त्यानंतर ते न्यायालयात हजर झाले व त्यांनी त्याचे म्हणणे निशाणी क्र. १५ वर दाखल केले आहे. प्रस्तुत अर्जात गैरअर्जदार क्र. १ यांनी अर्जदाराने खोटा अर्ज दाखल केल्याचे बचाव केला आहे तसेच अर्जातील संपूर्णपणे मजकुर अमान्य केला आहे परंतु गैरअर्जदार क्र १ यांनी त्यांचे नातेसंबंध मान्य केले आहेत. गैरअर्जदार क्र. १ यांनी असा बचाव केला आहे की, अर्जदार क्र. १ हे रागीट व हाटी स्वभावाचे असल्यामुळे छोटया छोटया कारणावरुन भांडण करण्यास सुरुवात केली गैरअर्जदार क्र. १ यांनी अर्जदार क्र १ यांना समजुन सांगण्याचा प्रयत्न केला परंतु तिच्या स्वभावात काहीच फरक पडला नाही उलट घरच्या लोकांशी भांडणे जास्त करीत असल्यामुळे गैरअर्जदार क्र. १ यांना वेगळे राहण्याची वेळ आली त्यानंतर अर्जदार क्र १ ही गैरअर्जदार क्र १ यांना शेतीची वाटणी करुन घ्या मला खेडयात राहायचे नाही असे म्हणुन नेहमी तंटा करीत असे तसेच गैरअर्जदार क्र. १ यास अर्जदार क्र. १ हीचे विवाहबाहय संबध असल्याचे निदर्शनास आले त्यामुळे गैरअर्जदार क्र १ हयाने त्यांची मुलगी लग्नास आली आहे वागणे बरोबर नाही असे सांगण्याचा प्रयत्न केला परंतु अर्जदाराच्या वागण्यात फरक पडला नाही त्यानंतर अर्जदार क्र १ अर्जदार क्र. २ व ३ यांना स्वत: घेवुन माहेरी घेवुन गेली. गैरअर्जदार क्र. १ हे अर्जदार क्र. १ यांना आणण्यासाठी गेले असता गैरअर्जदार क्र. १ यांना अर्जदाराच्या नातेवाईकांनी बाधुन मारहाण केली. गैरअर्जदार हे मोलमजुरी करुन त्यांची उपजिवीका भागवीतात त्यामुळे अर्जदारांना पोटगी वेगळी देण्याची ऐपत

नाही. अर्जदार क्र १ ते ३ हे स्वत:हुन निघुन गेल्यामुळे पोटगी देण्याचा हक्क व अधिकार नाही त्यामुळे अर्जदाराचा प्रस्तुतचा अर्ज बेकायदेशीर असुन खारीज करणे योग्य व न्यायवह आहे.

**३.** अर्जदार ही निराधार आहे. तिला कुठल्याही प्रकारचे उत्पन्नाचे साधन नाही. ती स्वत:ची उपजिविका भागविण्यास असमर्थ आहे.

**४.** त्यामुळे गैरअर्जदार क्रं ०१ यांच्याकडून अर्जदार क्र १ ते ३ यांना प्रत्येकी अंतरिम मासिक पोटगी रुपये ५०००/—, द्यावी अशी विंनती केली आहे. अर्जदाराने अर्जासोबत शपथपत्र दाखल केले आहे.

**५.** अर्जदारातर्फे श्री.एस.बी कुलकर्णी यांचा युक्तीवाद ऐकला तसेच गैरअर्जदारातर्फे एन.आर.देशपांडे यांचा युक्तीवाद ऐकला. माझे समोर खालील मुददे उपस्थित झाले त्याचे निष्कर्ष कारणांसहीत खालीलप्रमाणे देत आहे.

| **अनु.क्रं** | **मुददे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०१ | अर्जदार अंतरीम पोटगी मिळण्यास हक्कदार आहेत काय ? | होय |
| | जर होय तर किती रक्कमेस ? | अर्जदार क्र. १ ते ३ यांना दरमहा २०००/—रुपये अंतरीम पोटगी मजूंर करण्यात येत आहे |
| ०२ | काय आदेश ? | अर्ज अंशत: मंजूर करण्यात येत आहे. |

## कारणें

**मुद्दा नं.१ करीता** :

**६.** अर्जदाराचे सन्माननीय विधिज्ञ श्री.एस.बी कुलकर्णी यांनी युक्तीवाद केला

की,गैरअर्जदार क्र. १ भाजी पाला विक्रेते व शेती व्यवसाय करतात तसेच गैरअर्जदार क्र १ ते ६ हे वडीलोपार्जीत जमीनीमध्ये भाजीपाला लावतात ते भाजीपाल्याचे ठोक विक्रेते आहेत त्यांना भाजीपाल्याच्या उत्पनातुन वर्षाकाठी चार ते पाच लाख रुपये अंदाजे उत्पन्न होते. ते वर्षाकाठी चार ते पाच लाख रुपये कमवतात. अर्जदाराने अभिपटलावर निशाणी क्र. ०४ वर ७/१२ उतारा गट न. ५२/३ चा दाखल केला आहे तसेच ७/१२ उतारा गट न. ४९/०१ दाखल केला आहे तसेच ७/१२ गट न. ५१/१ दाखल केला आहे. ७/१२ गट न. ५२/०३ यांचे काळजीपुर्वक अवलोकन केले असता असे दिसुन येते की, मथुराबाई जकोजी यांचे नावे २ हेक्टर ५ आर जमीन असल्याचे निदर्शनास येते. ७/१२ गट न. ४९/०१ यांचे काळजीपुर्वक अवलोकन केले असता असे दिसुन येते की, आनंदा डाकोजी यांचे नावे २ हेक्टर ४४ आर जमीन असल्याचे निदर्शनास येते. ७/१२ गट न. ५१/०१ यांचे काळजीपुर्वक अवलोकन केले असता असे दिसुन येते की, तुळसााबई आनंद शहापुरे यांचे नावे ०.८१ आर जमीन असल्याचे निदर्शनास येते. ७/१२ गट न. ५१/०१ यांचे काळजीपुर्वक अवलोकन केले असता असे दिसुन येते की, आनंदा डाकोजी यांचे नावे ०.९७ आर जमीन असल्याचे निदर्शनास येते. गैरअर्जदार क्र. २ हे गैरअर्जदार क्र .०१ चे वडील आहेत व गैरअर्जदार क्र. ०४ ही गैरअर्जदार क्र. ०१ ची आई या सर्व जमीनी वडीलांच्या व आईच्या नावे असल्याचे दिसुन येते तसेच गैरअर्जदार क्र. ०१ यांच्या स्वत:च्या नावे जमीन असल्याचा कोणताही कागदोपत्री पुरावा अर्जदाराने दाखल केला नाही. गैरअर्जदार क्र. १ यांना अर्जदाराचे नाते संबंध मान्य केले आहेत. नातेसबंधाबददल अक्षेप घेतला नाही .गैरअर्जदार क्र. १ यांची कायदेशीर व नैतीक जबाबदारी पत्नी व मुले यांचा सांभाळ करणे त्यांना उदरनिर्वाहासाठी, शिक्षणासाठी व औषध उपचारासाठी खर्च पुरवणे ही गैरअर्जदार क्र. १ यांची कायदेशीर व नैतिक जबाबदारी आहे. त्यामुळे प्रथमदर्शनी अर्जदार क्र ०१ ते ०३ हे अंतरिम पोटगी मिळण्यास हक्कदार आहे.

७. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण २००५ या कायद्याचा उद्देश असा आहे कि, कुटूबांतर्गत घडना—या कोणत्याही प्रकारच्या हिंसेच्या व त्यासंबंधी अथवा त्या अनुषंगिक प्रकरणांच्या बळी ठरलेल्या महिलांना राज्य घटनेने शाश्वतीपुर्वक प्रदान केलेल्या अधिकारांना अधिक परीणामकारक संरक्षण पुरवणे. यावरुन हे निर्विवादपणे स्पष्ट होते कि, सदरचा कायदा हा अशा महिलांकरीता पारीत करण्यात आलेला हितकारी कायदा (Beneficial legislation) आहे त्यामुळे अर्जदारांच्या पुराव्यास अधिक महत्व देणे न्यायोचित ठरेल. तसेच अर्जदार क्र. १ ही, अर्जदार क्र.२ व ३ सह तिच्या माहेरी राहत आहे. त्या दिवसापासून आजपर्यत गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार क्र.१ हिला व अर्जदार क्र. २ व ३ यांच्यासह नांदण्यास घेउन न जाता त्या सर्वांचा त्याग करून संसाराचा भंग केलेला आहे यावर अविश्वास दाखविण्यासारखे मला काहींही वाटत नाही. अर्जदार क्र.१ हिने गैरअर्जदार क्र. ०१ यांच्याकडुन होणा—या हिंसाचाराबाबत संरक्षणाची मागणी केली आहे, कोणत्याही स्त्रीला तिच्या पतीस अकारण अडचणीत आणण्याची व स्वत:चा संसार मोडण्याची ईच्छा नसते. परिस्थिती आवाक्याबाहेर गेल्यावरच पत्नीकडून असे पाउल उचलेले जाते आणि तिचा घरगुती कारणांसाठी शारिरिक व मानसिक छळ करून तिच्यावर कौटुंबिक हिंसाचार केल्याचे प्रथम दर्शनी सिद्ध होत आहे. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण २००५ सदरील कायद्य ाचा उद्देश विचारात घेवून परिस्थितीचे विश्लेषण केले असता असा निष्कर्ष निघतो कि, दोंन्ही पक्षांच्या राहणीमानाचा दर्जा विचारात घेता अर्जदार क्र.१ हिच्यावर झालेल्या कौटुंबिक हिंसाचाराबद्दल तिला व अर्जदार क्र.२ व ३ यांना आर्थीक मदत देणे क्रमप्राप्त होते.

**०८.** अर्जदार क्र.१ यांनी शपथेवर कथन केले आहे कि, गैरअर्जदार क्र.१ हा भाजीपाल्याचे ठोक विक्रेते आहेत त्यांना भाजीपाल्याच्या उत्पनातुन वर्षाकाठी चार ते पाच लाख रुपये अंदाजे उत्पन्न होते गैरअर्जदार क्र.१ हा आर्थिकदृट्या सधन आहे. गैरअर्जदार क्र.१ याचेवर कोणतीही ईतर जबाबदारी नाही. गैरअर्जदार क्र. ०१ हे भाजीपाला विक्रेते आहेत. त्यामुळे वर नमुद कामापासुन काही—ना—काहीतरी गैरअर्जदार क्र.१ यास उत्पन्न मिळत असावे असे गृहीत धरणे आवश्यक आहे. अशा परिस्थतीत गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार क्र.१ ते ३ यांना वाजवी पोटगी देण्यास समर्थ आहे ही बाब सिद्ध होत आहे. वरील सर्व बाबी विचारात घेता गैरअर्जदार क्र १ याने अर्ज दाखल तारखेपासून अर्जदार क्र. १ हिला पोटगी दरमहा रुपये २०००/— { रुपये दोन हजार मात्र} व अर्जदार क्र.२ आणि ३ यांना प्रत्येकी दरमहा रुपये २०००/— {रुपये एक हजार रूपये मात्र} सज्ञान होईपर्यंत अन्न, वस्त्र आणि औषधपाणी याकरीता मिळण्यास पात्र असुन गैरअर्जदार क्र.१ हा सक्षम आहे, असे माझे स्पष्ट मत आहे.

**०९.** कुठलाही व्यक्ती साधारण: कमीत कमी १० ते १२ हजार रुपये कमवितो. गैरअर्जदार क्रं १ हा अर्जदाराचा पती व अर्जदार क्र. २ व ३ चे वडील आहेत. त्यांचा सांभाळ व पालनपोषण करण्याची जबाबदारी गैरअर्जदार क्र. ०१ यांच्यावर आहे . त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने अर्जदार क्र. ०१ ते ०३ ंयाना प्रत्येकी रुपये २०००/— अंतरिम पोटगी देणे उचित व योग्य ठरेल. म्हणुन मी मुद्दा नं.१ चे उत्तर अंशत: होकारार्थी देत आहे व खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**१.** अर्जदार क्र. ०१ हिचा अर्ज निशाणी क्र. ०८ अंशत: मंजुर करण्यात

येत आहे.

**२.** अर्जदार कं ०१ ते ३ यांना प्रत्येकी गैरअर्जदार क्र. १ यांने दरमहा २०००/— रुपये ( दोन हजार रूपये फक्त ) अंतरीम पोटगी या प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत हा अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासुन दयावा असा आदेश देण्यात येत आहे.

**३.** अर्जदारास विनामुल्य आदेशाची प्रत ताबडतोब द्यावी.

स्वाक्षरीत/—
दिनांक : २४.०३.२०२२ (गजानन रा. डोरनलपल्ले )
ठिकाण : नायागवा बा. न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, नायगाव बाजार
२ रे सह न्यायालय जि. नांदेड

**CERTIFICATE**

*I affirm that the contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order.*

| | |
|---|---|
| Name of the Stenographer/ Clerk | : A.U. Kare |
| Court Name | :2nd Jt. C.J.J.D. & J.M.F.C.Court<br>Naigaon Bz. Dist. Nanded. |
| Date | : 24/03/2022 |
| order signed by the<br>Presiding Officer on | : 24/03/2022 |
| order uploaded on | : 24/03/2022 |